FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. २७/१८, Year, दिनांक Date १८/०७/१८

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा - २०१८), कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शुक्रवार, तारीख पासून Date from १५/०७/१८, वेळ Time ११:००, तारीख पर्यंत Date to १८/०७/१८, वेळ Time ...
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date १५/०७/१८, वेळ Time ...
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. लेखी ०२/१८, तारीख Date २०/०७/१८, वेळ Time ०४:००

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ...
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name के. आर. म्हात्रे मार्ग, टँक बंदर, नाझिर चहावाल्या जवळ, डॉक रोड (पूर्व) माझगाव, मुंबई १० — ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road, जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place, Village, Post, तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Distt. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. गुलाम नबी (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name अजगरअली इद्रिसी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ४८ वर्षे, (d) राष्टीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९३२४९३४२४२
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ... दिल्याचा दिनांक Date of Issue ... दिल्याचे ठिकाण Place of Issue ... (f) व्यवसाय Occupation ...
   (g) धर्म Religion ..., जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता : Address : ... गल्ली / सर्वे नं. Ward ... घर / नाव नंबर House/Name No. ... फोन /मो. नंबर Phone/M. No. ... पॅन नं. Pan No. ... वोटर्स नं. Card No. ...
   रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn., तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State, सध्याचा पत्ता Present Address: रुम नं. १ व २, पहिला माळा, प्लॉट नं. ६५, मोदी कंपाउंड, घोडपदेव रोड नं. २, माझगाव, मुंबई-१०

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   १) मुबारक नासिर शेख वय ५४ वर्षे, धंदा. विदयुत मिस्त्री इन्स्पेक्टर, रा.ठि. ८/२५, बेस्ट स्टाफ क्वाटर्स, टिळक रोड, वडाळा (प). मुंबई-३१
   २) असलम कासम नाईक वय ३४ वर्षे, धंदा. वायरमन (खाजगी इसम) रा.ठि. रुम नं. १, अल्लाउद्दीन चाळ, घोडपदेव रोड नं. ०, माझगाव, मुंबई-१०

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी नामे गुलाम नबी अनगरअली इद्रीसी,
वय: ४८ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी, रा. डि' रुम नं. १, २
पहिला माळा, फ्लॅट नंबर १५, मोदी कंपाऊंड, माझगाव,
मुंबई नंबर १० यांना संगणकावर सविस्तर जबाब नोंद
केला असून त्यास या गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल
संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(विनोद पाटील)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई.

190719

खरी नक्कल

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ लागलीच
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........ —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे घरात नविन विदयुत मिटर बसविण्याकरीता यातील आरोपी क्र.१ याने रु.४०००/- ची लाचेची मागणी करुन ती आरोपी क्रमांक ०२ यांचे मार्फतीने स्विकारली म्हणुन दोघे आरोपींना विरुद्ध भ्र.प्र.प्रतिबंधक अधि.१९८८ (सुधारणा-२०१८) कलम-७ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक विनोद पाटील

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........,
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)
[signature] १०/१९

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही [signature]
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name .. विनोद स. पाटील
पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting ला.प्र.वि. मुंबई
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

खरी नक्कल
[signature]

जबाब                                                    दिनांक १९/०७/२०१९

श्री गुलाम नबी ( मोहम्मद नबी ) अजगरअली इद्रीसी वय ४९ वर्षे, व्यवसाय– खाजगी नोकरी, रा.ठि. मोदी कंपाउड, प्लॉट नं.१५, पहिला माळा, खोली क्र.०१ व ०२, घोडपदेव रोड नं.१, माझगाव मुंबई १० फोन नं. ९३२४९३४२४२

मी वरीलप्रमाणे असून वरील पत्यावर जन्मापासून कुटूबियासह रहावयास आहे. मी सामाजीक कार्य म्हणुन आयएएस, आयपीएस अॅकेडमीचे ऑन लाईन क्लासेस चालविण्याचे काम करतो. तसेच भेंडी बाजार येथील नलबाजार येथे ओरिएन्टल कॉन्ट्रक्टर कंपनी येथे सुपरवायजर म्हणून खाजगी नोकरी करतो. सदरच्या नोकरीतुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझ्या कुटुंबाचा उदारनिर्वाह चालतो.

मी मोदी कंपाउड, प्लॉट नं.१५, पहिला माळा, खोली क्र.०१ व ०२, घोडपदेव रोड नं.१, माझगाव येथे राहत असलेल्या घराचे अद्याप पर्यत मिटर कनेक्शन बसविले नाही. माझी तब्बेत ठिक राहत नसल्याने सदरचा रूम माझा मुलगा नामे मोहम्मद सलीम गुलाम नबी इद्रीसी वय २८ याचे नावावर केला असुन त्याकरीता त्याचे नावावर सदर रूमचे बेस्टचे इलेक्ट्रीक मिटर लावण्याकरीता दिनांक १७/०६/२०१९ रोजी मा.अभियंता ग्राहक सेवा, बेस्ट भवन, विदयुत पुरवठा, बृहन्मुंबई महानगर पालीका, मुंबई सेंट्रल बस डेपो "ई"विभाग येथे नविन विद्युत मिटर कनेक्शन बसविण्यासाठी अर्ज केला होता. ई विभाग, ग्राहक सेवा मा. अभियंता यांनी माझे घरासाठी विद्युत मिटर बसविण्यासाठी परवानगी मिळाली असल्याने मुंबई सेंट्रल डेपो,ई वार्ड येथे नेमणुकीस असलेले मुबारक शेख यांनी माझे घरी येवुन कॅबिनमध्ये नविन विद्युत मिटर बसवुन देतो असे सांगितले. त्यांनतर काही दिवसानी कॅबिनमध्ये विद्युत मिटर बसविण्यासाठी जागा नसल्याचे सांगुन, नविन विद्युत मिटर बसविण्यास टाळाटाळ करीत होते. त्यानंतर मला फोनवरून विद्युत मिटर बसविण्याकरीता रू.५००/– दयावे लागतील असे सांगुन माझेकडे रू.५००/– ची लाचेची मागणी केली. लोकसेवक मुबारक शेख यांनी माझे वर नमुद घरी विदयुत मिटर बसविण्याकरीता रू. ५००/– मागणी केलेली रक्कम मला देण्याची इच्छा नसल्याने दिनांक १८/०७/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुबई येथे लेखी तक्रार दिली.

दि. १८/०७/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पो.नि पाटील यांचेकडे लोकसेवक मुबारक शेख यांचेविरोधात लेखी तक्रार अर्ज दिला. सदर तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्याप्रमाणे दि. १८/०७/२०१९ रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन शासकिय पंचाना ब्युरो कार्यालयात पाचारण केले. त्यांना मी दिलेला तक्रार अर्ज वाचण्यास दिला व त्यानंतर अर्जावर पो.नि पाटील व पंचानी त्यांची स्वाक्षरी केली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लोकसेवक शेख यास त्याचे मोबाईलवर संपर्क साधुन भेटण्याकरीता जाण्याचे ठरले. त्यानुसार नमुद दिवशी पो.नि.पाटील, पंच व मी असे ब्युरो कार्यालयाचे गोपनीय कक्षात जावुन लोकसेवक शेख यांना त्यांचे मोबाईल क्रमांक ८८५००५८४११ वर संपर्क साधला असता नमुद दिवशी दुपारी सुमारे ०३:००वा. येतो असे सांगितल्याने त्यानुसार पोलीस निरीक्षक वि.पाटील, पंच व सापळा पथक असे आम्ही मी राहत असलेल्या वर नमुद ठिकाणी लोकसेवक शेख येणार असुन पडताळणी करणेकरीता जाणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान लोकसेवक शेख याचेकडुन लाचेची मागणी करण्यात आल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात येवुन पडताळणी दरम्यान माझे व लोकसेवक

समक्ष

VPatil

( विनोद पाटील)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि.वरळी मुंबई

19/07/19
Gulam Nabi Ar Idrisi

खरी नक्कल
VPatil
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Scanned with OKEN Scanner

शेख यांचेत होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी.कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

पो.नि पाटील यांनी लोकसेवकाचे कार्यालयाबाबतत विचारणा केली असता, लोकसेवक मुबारक शेख हे विदयुत मीटर इन्स्पेक्टर असुन ते मुंबई सेंट्रल बेस्ट डेपो, ई वार्ड येथे कार्यरत आहे.

मी, पंच व पोलीस पथक हे सफेद रंगाच्या बोलेरो या पोलीस वाहनातुन लोकसेवक माझे राहत्या घरी विदयुत मिटर कनेक्शन बसविण्यासाठी येणार असल्याने लोकसेवकास भेटण्यासाठी जायचे असल्याने आम्ही रे रोड रेल्वे स्टेशन येथुन पी डीमेलो रोड येथील भारत पेट्रोलीयम पंपा समोर, कोणासही संशय येणार नाही अशा रितीने पोलीस वाहन उभे केले. त्यांनतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी मला, पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देवुन माझे आतील बनियनला व्हाईस रेकार्डर लावले व पंच श्री.जाधव यास माझे बरोबर जाण्यास सांगितले. मी व पंच श्री.जाधव हे माझे घराजवळ लोकसेवक श्री.मुबारक शेख यांना भेटलो असता कामाचे बाबतीत चर्चा होवुन लोकसेवकाने नविन मिटर कनेक्शनचे काम दिनांक १९/०७/२०१९ रोजी करून देतो असे सांगितले. त्यामुळे मी पंचासह पोलीस वाहन पार्क केलेल्या ठिकाणी येवुन पो.नि पाटील यांना घडलेल्या हकीकती बाबत सांगितले. सदर दिवशी सापळा काढुन घेण्यात येवुन आमच्यात झालेले संभाषण पंच यांना ऐकवुन बरोबर असल्याचे खात्री करून नमुद संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी.कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित झाले त्याचा दोन पंचासमक्ष पंचनामा करून सिलबंद करण्यात येणार असल्याचे सांगितले.

पो.नि.पाटील यांचे सुचनेप्रमाणे दि. १९/०७/२०१९ रोजी पडताळणी कारवाईसाठी पंच व सापळा पथक हे मी राहत असलेल्या जागे पासुन रे रोड रेल्वे स्टेशन समोर, पी डिमेलो रोड, झेनिथ टिम्बर कार्पोरेशन येथे येणार असल्याचे सांगितले. पोलीस पथक आल्यावर मी सदर ठिकाणी गेलो सदर ठिकाणी सापळा कारवाईची प्राथमिक तयारी करण्यात येवुन पो.नि.पाटील यांनी मला,पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पथक येण्याचे आधी मला लोकसेवक श्री.शेख यांनी त्यांचे वर नमुद मोबाईल क्रमांकावरून संपर्क साधुन १२:००वा. येणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार पो.नि.पाटील यांनी मला व पंच यास सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टच्या आतील बनियानला लावुन माझे घरी जावुन लोकसेवक विदयुत इलेक्ट्रीक मिटर लावण्याकीता येणार आहे तेथे जावुन भेट घेण्याचे सांगितले.त्यानुसार मी व पंच श्री.जाधव हे माझे घरी जावुन थांबलो. काही वेळाने लोकसेवक श्री.मुबारक शेख व त्यांचे सोबत त्यांचे हेल्पर माझे घरी मिटर बसविण्या करीता आले व त्यांनी मिटर बसविन्याचे आधी ठरल्याप्रमाणे पैशांबाबत विचारणा केली असता तुम्ही काम करा मी रू.५००/– घेवुन येतो असे सांगुन पंच जाधव यांचेसह पोलीस वाहन जवळ आलो.

त्यानंतर सापळा पथक यांना सविस्तर हकीकत सांगितली. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंच व आम्ही ऐकले असता लोकसेवक मुकारक शेख यांनी नविन विदयुत मिटर कनेक्शन बसविण्यासाठी रू.५००/– ची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

समक्ष

VPatil

( विनोद पाटील)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि.वरळी मुंबई

19/07/19

Gulam Nabi A. Idrisi

VPatil

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी माझेकडे ■चतीतुन असलेले लाचेकरीता मागणी केलेली रू.५००/— सापळा पथकास पंचासमक्ष दिले. त्यामध्ये ■.५००/— दराची एक नोट दिली. सदर नोटेचा क्र 6 NW 818193 असा आहे. पथकातील एका अंमलदाराने लाचेच्या रक्कमेला पंचासमक्ष कापसाच्या बोळयाने ॲन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पो.नि.पाटील यांच्या सुचनेवरुन सदर भारतीय चलनी नोट ही घडी केलेली रू.५००/— माझे शर्टच्या डाव्या खिशात अलगदपणे ठेवली व सुचना दिल्या. त्यानंतर पथकाने सापळा कारवाई करण्याचे आयोजन केले.

लोकसेवक मुबारक शेख यांची माझे राहते घराजवळ असलेल्या मिटर केबीन जवळ भेट घेतली असता श्री.मुबारक शेख याने मला पाच मिनीटानी के.आर.म्हात्रे मार्ग टॅक बंदर, नझिर चहा वाल्याजवळ बोलाविले. त्यावेळी मी व पंच श्री.जाधव यांचेसह गेलो असता लोकसेवक मुबारक शेख याने माझेकडे हाताने इशारा करून मागणी केलेली लाचेची रक्कम माझे घरी मिटर बसविण्या पुर्वी लाकडी फळी बसविण्याकरीता आलेला इसम नामे श्री. अस्लम कासम नाईक यांचेकडे देण्याचे सांगितले नुसार मी पंच जाधव यांचे समक्ष अस्लम नाईक यांचेकडे मागणी केलेले रू. ५००/— ची नोट दिली व त्याने लगेच लोकसेवक श्री मुबारक शेख यांचे हातात दिले त्यावेळी मला सापळा पथकाने दिलेल्या सुचने प्रमाणे लोकसेवक श्री मुबारक शेख याने लाचेची रक्कम स्विकारल्यावर सापळा पथकास हात वर करून इशारा दिला असता सापळा पथकाने लोकसवेक श्री मुबारक शेख यास रंगेहाथ पकडले. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई येथे घेवुन आले.

माझे लोकसेवक मुबारक नासीर शेख व अस्लम नाईक यांच्याशी कोणतेही पूर्व वैमनस्य नसून कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी दि.१८/०७/२०१९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पो.नि. पाटील यांनी आयोजित केलेल्या पडताळणी/सापळा कारवाई मध्ये लोकसेवक मुबारक शेख यांनी घराचे नविन विमिटर बसविण्यासाठी माझेकडे रुपये ५००/— लाचेची मागणी करुन ती माझेकडुन अस्लम नाईक याचे मार्फतीने स्विकारताना पोलीसांनी रंगेहाथ पकडले. म्हणून माझी लोकसेवक मुबारक नासीर शेख व अस्लम नाईक यांचेविरुध्द फिर्याद असून योग्य ती कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत संगणीकृत केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

VPatil

( विनोद पाटील )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

19/07/19
Gulam Nabi A. Idrisi

VPatil